

# मालाडमध्ये उघड्या गटारातील पोत्यात आढळले बाळ

■ प्रतिनिधी, मुंबई

**जीवदया अभियान मालाड फाऊंडेशन संस्थेची वेळीच मदत**

मालाड पूर्व येथील एका रस्त्याच्याकडेला अत्यंत हृदयद्रावक प्रकाराचा सामना एका प्राणीमित्राला करावा लागला. रस्त्याच्या कडेने जाताना त्याला एका बेवारस गोणीमधून आवाज आला. त्याने त्या आवाजाकडे काळजीपूर्वक लक्ष वेधले असता तो आवाज कुत्र्याच्या पिल्लाचा असावा असे त्याला वाटले. त्याने गोणी सोडली. त्यानंतर त्याला जे दिसले त्याने तो गर्भगळीत झाला. गोणीत कुत्र्याचे पिल्लू नव्हे तर एक स्त्री जातीचे अर्भक होते. मालाड परिसरातील जितेंद्र रस्त्यालगत असलेल्या उघड्या गटारातील पोत्यात हे बाळ आढळून आले.

प्राप्त माहितीनुसार, प्राणीमित्र हा जीवदया अभियान मालाड फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेशी संलग्न आहे. त्याने गोणी उघडली तेव्हा त्याला हे स्त्री जातीचे नवजात अर्भक पाहून धक्का बसला. विशेष म्हणजे अर्भकाची नाळ नुकतीच कापली होती आणि ती तशीच उघडी होती. एनजीओच्या स्वयंसेवकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच, दिंडोशी पोलीस ठाण्यातही या घटनेबाबत माहिती दिली. पोलिसांनी हे अर्भक ताब्यात घेऊन एम.डब्ल्यू. देसाई म्युनिसिपल हॉस्पिटल, मालाड (पूर्व) मध्ये दाखल केले. प्राप्त माहितीनुसार ही घटना २७ जानेवारी दरम्यान घडली. रुग्णालयात अर्भकाची प्रकृती नाजूक असल्याचे सांगण्यात आले.

अर्भकाची प्रकृती नाजूक असूनही त्याच्या जगण्याच्या आदीम उर्मीमुळे त्याचे नाव 'जीविका' असे ठेवण्यात आले. आज जवळपास नऊ दिवस उलटून गेल्यानंतर अर्भकाच्या आरोग्यात लक्षणीय सुधारणा पाहायला मिळत आहे. प्राणीमित्र कार्यकर्त्या डॉ. नंदिनी कुलकर्णी यांनी जीविकाच्या संघर्षाचे आणि प्रतिकूल परिस्थितीतही जिवंत राहण्याचे कौतुक केले. जीवदया अभियान मालाड फाऊंडेशन संस्थेने वेळीच मदत आणि बचाव कार्य राबविल्याने नवजात अर्भकाचे प्राण वाचू शकले.

## शॉर्ट न्युज

### कांदिवलीत अल्पवयीन बालिकेवर लैंगिक अत्याचार

■ प्रतिनिधी, मुंबई

कांदिवलीतील एका शाळेत प्रायमरीमध्ये शिकणाऱ्या ४ वर्षांच्या विद्यार्थिनीवर शाळेच्या सुरक्षा रक्षकाने लैंगिक अत्याचार केला. या घटनेनंतर शाळा प्रशासनाने तिला पेन किलर देऊन घरी पाठवले, असा खळबळजनक आरोप पीडितेच्या वडिलांनी केला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असली तरी त्याच्यासोबत शाळा प्रशासनही याला जबाबदार असून, त्यांना कारागृहात डांबा, आरोपी सुरक्षारक्षकाला फासावर लटकवा, अशा मागण्या करत संतप्त पालकांनी सोमवारी शाळेसमोर पोलिसांना घेराव घातला. मात्र, तिच्या आईने तिला टॉयलेटला जाण्यास सांगितल्यावर तिने वेदना होत असल्याचे सांगत रडायला सुरुवात केली. शताब्दी रुग्णालयात मुलीला डॉक्टरने तपासले असता तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे उघड झाले. एक काला आदमी, अशी तिने त्याची ओळख सांगितली. याविरोधात समतानगर पोलिसांत तक्रार दिल्यावर पोलिसांनी आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. आरोपी व या घटनेची माहिती लपणाऱ्यांवर समतानगर पोलिसांनी पोक्सो कलम २१ आणि भारतीय दंड संहिता कलम ३७६(२) (ख) आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल केल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. सध्या आरोपी पोलिसांच्या ताब्यात असून पीडित मुलीवर अजूनही रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मोफत औषधे देण्याचा दावा, रुग्णांना बाहेरून औषधे आणावी लागतात


# जे.जे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा

■ प्रतिनिधी, मुंबई

जे.जे. रुग्णालयात औषधांचा तुटवडा ही समस्या नवीन नाही. रुग्णालयाशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णालयात काही औषधांचा साठा येईपर्यंत इतर औषधे संपतात. रुग्णालयाच्या ओपीडीमध्ये आलेल्या रुग्णांशी बोलले असता, काही औषधे रुग्णालयात उपलब्ध नसल्याचे समोर आले. रक्तदाब, ऑगमेंटिन (अँटीबायोटिक) आणि मल्टी व्हिटॅमिन्स उपलब्ध नाहीत.

ही औषधे रुग्णालयाच्या फार्मसीमध्ये उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाहेरून आणण्यास सांगण्यात येते.

जे.जे रुग्णालयात औषधांचा तुटवडा ही नवीन गोष्ट नाही. २०२२ मध्ये औषधांच्या तुटवड्याचा मुद्दा सभागृहात




**गेल्या दोन महिन्यांपासून औषधांचा तुटवडा**

उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर डिसेंबरमध्येही औषधांच्या तुटवड्याबाबत वृत्त प्रसिद्ध झाले होते.मात्र, आजही हा प्रश्न सुटलेला नाही.

रुग्णालयाशी संबंधित एका वरिष्ठाने अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, रुग्णालयात नेहमीच औषधांचा तुटवडा असतो. अमलोडिपिन, ऑगमेंटिन, मल्टी व्हिटॅमिनसह काही औषधे गेल्या दोन महिन्यांपासून उपलब्ध नाहीत. स्थानिक पातळीवर खरेदी करून फायदा होणार नाही, जोपर्यंत मोठा साठा एकाच वेळी येत नाही तोपर्यंत समस्या कायम राहतील. यापूर्वी रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालयांना औषधे व इतर वैद्यकीय साहित्य पुरविण्याची जबाबदारी हाफकिनकडे सोपविण्यात आली होती. पुरेशा पुरवठ्याअभावी हाफकिनला २०२२ मध्ये औषधांची खरेदी थांबवण्यास सांगण्यात आले. सरकारने औषधे खरेदी करण्यासाठी वैद्यकीय खरेदी कक्ष निर्माण केला, मात्र अजूनही औषधांचा तुटवडा आहे.

# ज्येष्ठांच्या घरांना 'महारेरा'चा आधार; अंमलबजावणी लवकरच

■ प्रतिनिधी, मुंबई

**गरजेनुसार घरे बांधण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर**

समाजात वाढणारी ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षात घेऊन शहरी भागात खास घरे उभारण्याची गरज निर्माण झाली असल्याने त्या दृष्टीने ज्येष्ठांच्या गरजा लक्षात घेऊन घरे बांधण्यासाठी 'महारेरा'ने मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. यात ज्येष्ठांसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींचा अंतर्भाव केला आहे. याची अंमलबजावणी लवकरच सुरू होणार आहे.

ज्येष्ठांसाठी अनेक विकासक याबाबतचे प्रकल्प बनवत असून त्याची मागणी वाढली आहे. पण, बांधकाम करताना ज्येष्ठांच्या गरजा लक्षात घेतल्या जात नसल्याने, त्यातून निवृत्त व ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक होऊ शकते. त्यामुळेच 'महारेरा'ने ज्येष्ठांच्या घरांसाठी मार्गदर्शक तत्त्वांचा मसुदा जाहीर केला. अनेक बिल्डरांनी आपल्या घरांची जाहिरात 'रिटायरमेंट होम्स' अशी केली. त्यातून ग्राहकांची दिशाभूल होत होती. तसेच अनेक प्रकल्पांमध्ये ज्येष्ठांसाठी असलेल्या घरांमध्ये आवश्यक ते निकषही पाळले जात नाहीत. नवीन घरात त्यांच्या गरजेच्या बाबी असायला हव्यात हे ओळखून महारेराने ही पावले उचलली. हे धोरण बनवणारी महारेरा ही देशातील पहिलीच नियामक संस्था ठरली आहे. नवीन मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी झाल्यानंतर विक्री कागदपत्रांमध्ये काही विशिष्ट तरतुदी कराव्या लागतील.

तसेच मार्गदर्शक तत्त्वानुसार घरे बांधावी लागतील. बिल्डिंगचे डिझाईन, हिरवा भाग, लिफ्ट, रॅम्प्स, जिने, कॉरिडॉर, प्रकाश योजना, हवा, सुरक्षा व सुरक्षितता आदी बाबींवर लक्ष केंद्रित करावे लागेल.




■ **माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पारदर्शकता महत्त्वाची - देवेंद्र फडणवीस**

संकेतस्थळाच्या माध्यमातून सामान्य नागरिकांना विभागाची सविस्तर माहिती उपलब्ध होत असून माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पारदर्शकता महत्वाची असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. नव्याने विकसित करण्यात आलेल्या संकेतस्थळांच्या लोकार्पण प्रसंगी फडणवीस म्हणाले की, नागरिकांना विविध माहिती घरबसल्या उपलब्ध होण्याचे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे संकेतस्थळ, सध्या नागरिकांना माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून माहिती हवी असते. संबंधितांना संकेतस्थळावर माहिती उपलब्ध असल्याचे कळविल्यास त्यांचा वेळ आणि श्रमाची बचत होईल. सुरक्षितेच्या दृष्टीने महत्वाची माहिती वगळता सर्व अद्ययावत माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी. संकेतस्थळांची देखभाल नियमित करण्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. विभागाचा विकासाचा वेग असाच वाढता ठेवण्यात यावा, अशा सूचनाही फडणवीसांनी केल्या. जलसंपदा प्रकल्प नियोजन हे नदी खोरे निहाय केले जात असल्याने राज्यातील जलसंपदा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ५ पाटबंधारे विकास महामंडळांची स्थापना करण्यात आली आहे. महामंडळ कामाचा व्याप हा मोठा असल्याने प्रत्येक महामंडळ करत असलेल्या कामकाजाविषयी माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.

# सुरक्षेसाठी पादचाऱ्यांनी नियमांचे पालन करावे !

■ प्रतिनिधी, मुंबई



**सहपोलीस आयुक्त प्रवीण पडवळ यांचे आवाहन**

रस्ता सुरक्षा व वाहतूक सुरक्षा नियमांचे पालन करताना केवळ चालकांनीच नव्हे, तर पादचाऱ्यांनीही नियमांचे पालन करावे, असे आवाहन सहपोलीस आयुक्त प्रवीण पडवळ यांनी विद्यार्थ्यांना केले. अंधेरीच्या श्री नागरदास धारसी भुता हायस्कूलच्यावतीने वाहतूक सुरक्षा जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पोलीस उपायुक्त नितीन पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त दत्तात्रय बोराटे, योगेश तांदळे उपस्थित होते.

सुधारित पायाभूत सुविधा रस्ते सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावतात. चांगले डिझाईन केलेले रस्ते, योग्य सिग्नल, कार्यक्षम वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा आणि सुस्थितीत असलेली वाहने सुरक्षित वातावरणासाठी योगदान देतात तर विद्यार्थ्यांनी रस्ते सुरक्षा दूत बनावे, असे आवाहन शुभेंदु भुताजी यांनी केले. यावेळी रॅली, पथनाट्ये यांच्या माध्यमातून जानजागृती करण्यात आली.

# निवडणूक प्रचारासाठी बालकांचा वापर करू नये

■ प्रतिनिधी, मुंबई

प्रचारसभांमध्ये केल्या जाणाऱ्या भाषणांच्या घसरत्या दर्जावर उपाय योजण्यासाठी आणि दिव्यांग व्यक्तींप्रती (पीडब्ल्यूडीएस) आदरयुक्त भाषणे करण्यासाठी यापूर्वी देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने, केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणुकीशी संबंधित कोणत्याही उपक्रमामध्ये बालकांचा वापर करण्यासंदर्भात कठोर निर्देश जारी केले आहेत. भित्तीपत्रिका/पत्रके यांचे वाटप करणे अथवा घोषणा देणे, प्रचार फेऱ्या, निवडणुकीसाठी आयोजित बैठका इत्यादींमध्ये भाग घेण्यासह निवडणूक प्रचार मोहिमांमधील कोणत्याही उपक्रमात बालकांचा वापर करू नये अशा सूचना सर्व राजकीय पक्षांना देण्यात आल्या आहेत. राजकीय पक्ष आणि निवडणूक लढवणारे उमेदवार यांच्या द्वारे निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारे केलेला बालकांचा वापर खपवून घेतला जाणार नाही असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

निवडणुकीशी संबंधित उपक्रमांमध्ये बालकांच्या सहभागाला प्रतिबंध: प्रचार सभा, घोषणाबाजी, भित्तीपत्रिका अथवा पत्रके यांचे वाटप अथवा निवडणुकीशी संबंधित इतर कोणत्याही कामांसह निवडणूक प्रचाराच्या कोणत्याही पद्धतीमध्ये बालकांना सहभागी करून घेतले जाऊ नये असे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राजकीय नेते आणि उमेदवार यांनी बालकांना कडेवर घेणे, बालकांना स्वतःच्या वाहनात अथवा प्रचारसभेत सोबत ठेवणे यासह इतर कोणत्याही प्रकारे प्रचार सभांमध्ये बालकांचा वापर करू नये.

## मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक**

म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दूरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) हे जिल्हा उप निबंधक/पूर्व/मुंबई उपनगरे जिल्हा यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकूण ०५ कामाकरिता बी-१ (टक्केवारी) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. विस्तृत निविदा सुचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ०८.०२.२०२४ दुपारी १०.०५ पासून दिनांक १५.०२.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुद्धिपत्रक / बदल असल्यास http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व)/ मुं.झो.सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
CPRO/A/143

सही/-
कार्यकारी अभियंता (पूर्व),
मुं.झो.सु. मंडळ, मुंबई.

## AVANCE TECHNOLOGIES LIMITED

CIN: L51900MH1985PLC035210
**Regd. Off.:** Office No. 226/227, Majestic Center, Second Floor, 144 Opera House, Mumbai, Maharashtra, 400004 **Phone:** 919594988351
**Email:** info@avance.in, avancetechnologiesltd@gmail.com; **Web:** www.avance.in

**Extracts of the Statement of Un-audited Financial Results for the Quarter and Nine Months Ended on 31st December, 2023**

(Rs. in Lacs except EPS)

| Particulars | Standalone Quarter Ended on 31.12.2023 (Un-audited) | Standalone Quarter Ended on 31.12.2022 (Un-audited) | Consolidated Quarter Ended on 31.12.2023 (Un-audited) | Consolidated Quarter Ended on 31.12.2022 (Un-audited) |
|---|---|---|---|---|
| Total income from operations (net) | 3361.986 | 367.113 | 1902.018 | 367.113 |
| Net Profit/(Loss)for a period (before tax, Exceptional and/or Extraordinary items) | 14.206 | 8.166 | 191.552 | 8.166 |
| Net Profit/(Loss)for a period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 14.206 | 8.166 | 191.552 | 8.166 |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 14.206 | 8.166 | 191.552 | 8.166 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 14.206 | 8.166 | 191.552 | 8.166 |
| Equity Share Capital | 19819.174 | 19819.174 | 19819.174 | 19819.174 |
| Earnings Per Share (of Re.1 each) (for continuing and discontinued operations) | | | | |
| 1. Basic: | 0.001 | 0.004 | 0.010 | 0.004 |
| 2. Diluted: | 0.001 | 0.004 | 0.010 | 0.004 |

**Note:**
The above result is an extract of the detailed format of Un-audited Standalone and Consolidated Financial Results for the quarter ended 31st December 2023 filed with Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly results is available on website of Stock Exchange and on Company's website www.avance.in.
Figures of the previous year have been re-grouped/ re-arranged / re-classified wherever considered necessary.

**For Avance Technologies Limited**
Sd/-
**Srikrishna Bhamidipati**
**Managing Director - DIN: 02083384**

**Place: Mumbai**
**Date: 07th February 2023**

# मिठी नदीच्या रुंदीकरणासाठी ४५१.७५ कोटींची तरतूद

■ प्रतिनिधी, मुंबई



### पालिकेकडून तिसऱ्या टप्प्यातील कामाची सुरुवात

मिठी नदीच्या रुंदीकरण व खोलीकरणाचे आतापर्यंत ९५ टक्के काम झाले असून संरक्षक भिंतीचे काम ही ९० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे. मिठी नदीच्या तिसऱ्या टप्प्यातील कामासाठी पालिकेने सुरुवात केली असून पुढील १० वर्षांसाठी ३ हजार ६७ कोटी खर्च करणार असल्याचे यंदाच्या अर्थसंकल्पात प्रस्तावित आहे. मिठी नदीच्या विकास व प्रदूषण नियंत्रणाच्या आराखड्याची अंमलबाजवणी ही ४ टप्प्यात प्रस्तावित आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यासाठी पालिकेकडून ४५१.७५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

मुंबईतच उगम पावणाऱ्या आणि मुंबईतच समुद्राला जाऊन मिळणाऱ्या मिठी नदीची एकूण लांबी १७.८४ किलोमीटर इतकी आहे. या नदीचे पाणलोट क्षेत्र साधारणपणे ७ हजार २९५ हेक्टर एवढे आहे. २६ जुलै २००५ मध्ये झालेल्या पावसानंतर पुरपरिस्थिती हाताळण्यासाठी मिठी नदी विकास आणि संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली होती. विविध टप्प्यांमध्ये मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षण भिंत व सेवा रस्ता बांधण्याचे काम हाती घेण्यात आले होते.

## SLESHA COMMERCIAL LIMITED

CIN: L74140MH1985PLC266173
**Reg. Off.:Office B Wing, 12th Floor, Parinee Crescenzo Kautilya Bhawan-2, G-Block, Bandra Kurla Complex Mumbai 400051**
Tel: 022 - 25162488 Email-Id: roc.shivamtechno@gmail.com
Website: www.shivamtechnoprojects.com

**EXTRACT OF STATEMENT OF STANDALONE UN-AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER & NINE MONTHS ENDED ON 31ST DECEMBER, 2023**

[Rs in Lakhs except Earning/(loss) per share]

| | Particulars | Quarter ended 31.12.2023 (Unaudited) | Nine Months ended 31.12.2023 (UnAudited) | Quarter ended 31.12.2022 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 4.190 | 11.383 | 2.752 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax and Exceptional items) | 1.050 | 3.206 | 1.091 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items) | 1.050 | 3.206 | 1.091 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional items) | 1.050 | 3.206 | 1.091 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [comprising profit/(loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)] | 1.050 | 3.206 | 1.091 |
| 6 | Equity Share Capital | 304.90 | 304.90 | 304.90 |
| 7 | Other equity (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - |
| 8 | Earnings Per Share (of ₹10/- each) (for continuing and discontinued operations)- Basic & Diluted# | 0.003 | 0.011 | 0.004 |

# Not annualised for the quarter

**Notes:**
1. The above is an extract of the detailed format of Unaudited Financial Results for the quarter ended on 30th June, 2023 filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results are available on the website of the Stock Exchange www.bseindia.com and the Company's website www.shivamtechnoprojects.com
2. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 07th February, 2024
3. The above financial results have been prepared in accordance with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 (Ind AS) as prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 and other recognised accounting practices and policies to the extent applicable.

**For Slesha Commercial Limited**
Sd/-
**Babulal Kharwad**
**Managing Director**
**DIN: 08005282**

**Place: Mumbai**
**Date: 07th February, 2024**

## Cni RESEARCH LIMITED

**Regd. Office:** A-120, Gokul Arcade, Sahar Road, Vile Parle (East), Mumbai - 400 057.
**CIN No. : L45202MH1982PLC041643**
**Email id:** chamatcar@chamatcar.com **Contact:** 022-28383889

**STATEMENT OF STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR QUARTER ENDED 31.12.2023**

(Rs. In Lacs/amount)

| | Particulars | Current Quarter ending 31-12-2023 (Un-audited) | Preceding 3 months ended 30-09-2023 (Un-audited) | Corresponding year to date results 31-12-2022 (Un-Audited) | Corresponding year to date results 31-12-2023 (Un-Audited) | Corresponding year to date results 31-12-2022 (Un-Audited) | Year ended 31-03-2023 (Audited) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 158.12 | 264.52 | 351.08 | 731.71 | 912.72 | 958.78 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items#) | (20.25) | 15.48 | 56.56 | 56.88 | 100.07 | 49.34 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items and/or Extraordinary items#) | (20.25) | 15.48 | 56.56 | 56.88 | 100.07 | (85.66) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | (20.25) | 15.48 | 56.56 | 56.88 | 100.07 | (85.70) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 349.25 | (80.84) | 62.86 | 560.47 | 77.56 | (248.37) |
| 6 | Equity Share Capital | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 | 1148.05 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | (152.38) | (152.38) | 97.05 | (152.38) | 97.05 | (152.38) |
| 8 | Earnings Per Share (of Re.1/- each) (for continuing and discontinued operations) - | | | | | | |
| | 1) Basic: | (0.02) | 0.01 | 0.05 | 0.05 | 0.09 | (0.07) |
| | 2) Diluted: | (0.02) | 0.01 | 0.05 | 0.05 | 0.09 | (0.07) |

**Notes:**
a) The above is an extract of the detailed format of Quarterly/Annual Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings).
b) The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.
c) # - Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

For and on behalf of the Board of Directors of
For Cni RESEARCH LTD.
Sd/-
KISHOR P OSTWAL
MANAGING DIRECTOR
DIN: 00460257

Place: Mumbai
Date : 07/02/2024